# प्रेसनोट

दि.२३/११/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीगोंदा पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ), १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)उज्वला सतिष रजपूत, वय—३२ वर्ष, सरपंच, कोकणगांव, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर<br>२)सतिष बबन रजपूत, वय—४२ वर्ष, धंदा—शेती, रा.कोकणगांव, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ४६,०००/— रुपये तडजोडीअंती ४०,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४०,०००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हे शासकीय कॉन्ट्रॅक्टर असुन, त्यांनी कोकणगांव ग्रामपंचायत अंतर्गत गावातील रस्ता दुरुस्ती, संरक्षण भिंत बांधकाम अशा कामाचा ४,६१,५६८/— रुपयांचा कॉन्ट्रॅक्ट घेतला होता. तक्रारदार यांनी मुदतीत सर्व काम पूर्ण केले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे कामाचे बील अकाउंट ला जमा करणेबाबत सरपंच मॅडम व त्यांचे पती यांना विनंती केली असता त्यांनी एकूण बीलाच्या १० टक्के प्रमाणे ४६,०००/— रुपयांची लाच मागणी केली असल्याची तक्रार, तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर येथे दि. १०/७/२०२३ रोजी दिली. सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.१०/७/२०२३ रोजी कोकणगांव ग्रामपंचायत येथे लाच मागणी पडताळणी केली असता यातील लोकसेवक सरपंच उज्वला सतिष रजपूत व त्यांचे पती सतिष बबन रजपूत यांनी तक्रारदार यांचेकडे ४६,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४०,०००/— रुपये लाचेची मागणी केली व ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. बील जमा झाल्यानंतर आज दि.२३/११/२०२३ रोजी आरोपी लोकसेविका क्र.१ यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम घेऊन बोलविले असता कोकणगांव ग्रामपंचायत येथे आज दि.२३/११/२०२३ रोजी साापळा लावण्यात आला. सदर सापळा कारवाई दरम्यान लोकसेविका क्र.१ यांनी तक्रारदार यांचेकडून ग्रामपंचायत कोकणगांव येथे ४०,०००/— रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत श्रीगोंदा पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in

ई—मेल :— acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :— १०६४

दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :— ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर